जीवनाचा अविभाज्य भाग आहे. निदान तो असायला हवा. पण तो आहे का?

मराठी रंगभूमीचा मुख्य प्रवाह, व्यावसायिक नाटक, त्याचं आजचं चित्र कसं आहे? दुर्दैवानं ते उत्साहवर्धक तर नाहीच उलट अधिकांश चिंताजनकच आहे. व्यावसायिक रंगभूमी आज अनेक समस्यांना तोंड देत आहे. थिएटरची वाढलेली भाडी, वर्तमानपत्रांतल्या जाहिरातींचे न परवडणारे दर, वाढता प्रयोग खर्च आणि जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी ज्यावर अवलंबून रहायचं त्या बुकिंगच्या नावानं अक्षरश: ठणठणाट. या समस्या कमी आहेत म्हणून की काय त्यात भर म्हणून गंभीर, हेतूप्रधान नाटकांना प्रेक्षकांचा अत्यल्प प्रतिसाद, रंगभूमीवर आलेली तथाकथित विनोदी नाटकांची लाट आणि काही निर्मात्यांना कलावंत मालिकांत व्यस्त असल्यामुळे तारखा जुळवण्यात येणाऱ्या अडचणी. आणि या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे प्रचंड तोट्यात चाललेला व्यवसाय.

थिएटर्सची वाढलेली भाडी आणि जाहिरातींचे भरमसाट दर या दोन अर्थकारणाशी संबंधित असलेल्या बाबी निर्मात्यांच्या नियंत्रणापलीकडे आहेत. थिएटरवर बहिष्कार निर्मात्यांना परवडण्यासारखा नाही. त्याचं कारण निर्मात्यांत एकी नाही. निर्मात्यांनी वर्तमानपत्रांवर बहिष्कार टाकला तर त्याचं त्यांना सोयरसुतक नाही हे आपण पहातोच. प्रयोग खर्चात काटछाट करायची म्हणजे ज्यांच्यावर प्रयोग अवलंबून त्या कलावंतांचं मानधन कापायचं इतकंच शक्य. थिएटर संचालकांना आपण निदान आवाहन करु शकतो की बाबानो, नाटक जगलं तर तुम्ही जगाल. पण असं आवाहन आपण वर्तमानपत्रांना करु शकत नाही की नाटक जगलं तर तुम्ही जगाल. आपण फक्त त्यांच्या चांगुलपणाला आवाहन करु शकतो. मराठी वृत्तपत्रांना माझं आवाहन आहे. नाटक व्यवसाय खडतर परिस्थितीतून जात आहे. मराठी रंगभूमी बहरावी, तिचा उत्कर्ष व्हावा असं तुम्हालाही निश्चित वाटत असणार. मराठी रंगभूमीचा उत्कर्ष हा आपल्या सांस्कृतिक जबाबदारीचा भाग मानून आपण आम्हाला सहकार्य द्या, जाहिरातीचे दर परवडण्यासारखे करा. तुम्ही हे कराल अशी मी आशा करतो. कलावंत सर्वसाधारणपणे तारखांच्या आणि मानधनाच्या बाबतीत निर्मात्यांना जास्तीत जास्त सहकार्य देतात आणि देत राहतील. कारण नाटक हे त्यांचं पहिलं प्रेम आहे.

विनोदी नाटकांच्या लाटेसंबंधी फार मोठा बाऊ केला जातो असं मला वाटतं. या तथाकथित विनोदी नाटकांच्या लाटेनं रंगभूमीचं भवितव्य धोक्यात येईल